## प्रकरण पहिले

# महाराष्ट्रातील शेतक-यांचा प्रश्न

## प्रकरण पहिले

## महाराष्ट्रातील शेतक-यांचा प्रश्न

### प्रस्तावना -

महाराष्ट्रात शेतक-यांच्या प्रश्नावर अनेक थोर नेत्यांनी संघर्ष केला. महाराष्ट्रातील प्रगती शेतीच्या प्रगतीवर आधारलेली आहे. त्यामुळे गेल्या शतकाच्या मध्यापासून शेतक-यांच्या प्रश्नाचा विचार सुरु झाला. महात्मा जोतिराम फुले यांनी "शेतक-यांचा आसूड" हे पुस्तक लिहून त्या प्रश्नास वाचा फोडली. लोकमान्य टिळकांनी कॉंग्रेसने शेतक-यांचा प्रश्न हाती घेतला पाहिजे असा आग्रह धरला.

"हिंदुस्थानांतल्या हिंदुस्थानात लोकमत अधिक जागृत व जोरदार झाले पाहिजे, सर्व शेतकरी, कुळंबी, माळी, साळी, कोळी यांस जेव्हा राष्ट्रीय सभेचे ठराव समजून देऊन त्यांच्यात त्या ठरावाप्रमाणे वर्तनक्रम ठेवण्याची बुध्दी जर आम्हाला उत्पन्न करता येईल तरच राष्ट्रीय सभेचे हेतु तडीस जातील. आम्ही शिकलेले लोक दरवर्षी एकत्र जमल्यापासून कांही विशेष व्हावयाचे नाही." [१] असे लोकमान्य बाळ गंगाधर टिळकांनी २४ डिसेंबर १८९५ रोजी उद्गार काढले.

महाराष्ट्रात ब्रम्हणेतर व सत्यशोधक चळवळीतील नेत्यांनी शेतक-यांचा प्रश्न सर्वात महत्त्वाचा मानला. शेतक-यांचा प्रश्न सोडवायचा असला तर साम्राज्यशाही आणि सरंजामशाही हे शेतक-यांचे दोन शत्रू आहेत. हे महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, केशवराव जेधे आणि इतर पुढा-यांनी ओळखले आणि ते कॉंग्रेसमध्ये सामील झाले. श्री. नाना पाटील हे याच परंपरेतील पुढारी होते. साम्राज्यशाही आणि सावकारशाही यांच्याविरुध्द त्यांनी लढा पुकारला. प्रस्तुत प्रबंधात श्री. नाना पाटील यांच्या

कार्याचा आणि विचारांचा महाराष्ट्रातील शेतकरी प्रश्नाच्या संदर्भात आढावा घेण्यात आला आहे.

## इंग्रज राजवट आल्यानंतर शेती व्यवस्थेत झालेली स्थित्यंतरे -

ब्रिटिशांचे राज्य महाराष्ट्रावर प्रस्थापित झाल्यानंतर महाराष्ट्रातील प्रस्थापित वर्गास त्याचे वैषम्य वाटणे साहजिकच होते. कारण पेशवाईचा त्यांना मोठा फायदा झाला होता. पण ब्राह्मणातील एका गटाने त्याचे स्वागत केले. बाळाजीपंत नातू हा त्यांचा पुढारी. या वर्गाने झपाटयाने इंग्रजी शिक्षण घेऊन शासनातील खालच्या पातळीवरच्या नोक-या पत्करण्यास सुरुवात केली. मात्र इंग्रजी राज्याचा खरा वाईट परिणाम येथील बहुसंख्य मराठा व तत्सम शेतकरी समाजावर पडला. कारण इंग्रजी राज्यात शेतीवर कर वाढले व त्याचबरोबर लाखो मराठी शिपाई पेशवे, शिंदे, होळकर, भोसले, गायकवाड यांचा पाडाव झाल्यामुळे पुन्हा शेतीक्षेत्रात परतले. कारण त्यांना आता काम राहिले नाही. त्यामुळे शेतीतील उत्पन्न कमी व खाणा-यांची तोंडे जास्त झाली. शेतीवर बोजा वाढला. म.फुले यांनी असे अनुमान केले की, "शेतीवर त्यामुळे जवळ जवळ वीस ते पंचवीस लाख लोकांचा बोजा पडला." [२]

मध्ययुगातील राज्यकर्ते सा-याची आकारणी करताना खेडे हाच घटक धरत होते. प्रत्येक खेडयातील एकूण सारा वसुलीचे काम पाटील, कुलकर्णी यांचेकडे होते. ब्रिटिशपूर्व काळात महाराष्ट्रामध्ये जमिनीची वैयक्तिक मालकी हक्क नव्हता. सरंजामशाहीमध्ये तो काही प्रमाणात काही लोकानांच होता. जमिनीची खरेदी विक्री करता येत नव्हती. ब्रिटिशांनी या पध्दतीमध्ये मोठ्या प्रमाणात बदल केला. त्यांनी जमिनीमधून जास्तीजास्त कर गोळा करण्याचे धोरण स्वीकारले. ब्रिटिश आमदानीत रयतवारी पध्दतीत जमिनीच्या खाजगी मालकीचे तत्त्व मान्य केले. यामुळे पाटलाऐवजी व्यक्तिशः

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY

प्रत्येक शेतक-यांवर येऊन पडली. यामुळे महसुलाच्या सामायिक जबाबदारीचे तत्त्व संपुष्टात आले. ग्रामसंस्थेला उतरती कला लागली आणि शेतकरी एकाकी पडला. भांडवलशाहीतील खाजगी मालकीचे तत्त्व कृषी क्षेत्रास लागू केल्यामुळे खेडयातील अर्थव्यवहारात फार मोठा बदल झाला. आणि यामधूनच शेतीच्या -हासाला आणि शेतक-यांच्या अवनतीस प्रारंभ झाला. "इंग्रजांनी आपल्या काळात नवीन धारापध्दती अमंलात आणली. जमिनी-च्या प्रत्येक तुकडयाची मोजणी करून त्याला भूमापन क्रमांक दिला. प्रत्येक खेडयाचा नकाशा तयार केला. प्रत्येक तुकडयावर महसूल कर आकारण्यात आला. त्यानुसार महसुलाचे दर तीस वर्षापर्यंत कायम करण्यात आले." [३]

ब्रिटिशांचे राज्य आल्यामुळे देशात शांतता प्रस्थापित झाली. पण त्यामुळे बेकारी प्रचंड प्रमाणावर वाढली. सैन्यातील लोक घरी आल्यामुळे शेत जमिनीवर त्यांचा भार पडला. शांततेच्या काळात लोकसंख्या वाढली. या वाढत्या लोकसंख्येमुळे कुटुंबांची संख्या वाढली. वाढत्या कुटुंबामुळे शेतजमिनीचे तुकडे पडले. हे शेतजमिनीचे पडलेले तुकडे एवढे लहान होते की, त्यामुळे शेतीतून निघणा-या उत्पन्नातून कुटुंबाची आणि गुरा-ढोरांची गुजराण करतांना शेतक-यांना नाकी नऊ येत होते. शेतजमिनीचे जे अनेक तुकडे पडले होते. त्यामुळे ज्यांच्याजवळ शेतजमिन कसण्यासाठी बैल व अवजारे नव्हती त्यांनी ते तुकडे ज्या शेतक-याजवळ नांगर नि बैल होते त्यांना कसावयास किंवा विकत दिले. आणि भूमिहीन शेतकरी सुताराकडे, लोहाराकडे उदरनिर्वाहासाठी काम मिळावे म्हणून वणवण फिरत होते. गव्हाच्या किंवा तांदळाच्या कोंडयावर व आंब्याच्या कोंड्यावर कशीबशी गुजराण करीत होते. त्यामुळे म. फुले लिहितात की, "जंगल खात्याने ग्रामीण भागातील कुरणे ताब्यात घेतली. त्यामुळे शेळ्या मेंढयाना चराव्यास जागाच शिल्लक राहिली नाही." [४] शेतक-यांचा हा जोडधंदा ही बंद पडला.

शेतक-यांना यामुळे आधारासाठी पडिक जमिनसुध्दा उरली नाही. थोडक्यात अपुरे क्षेत्र, लोकसंख्येचा वाढता भार आणि मागास शेती उत्पादन पध्दती यामुळे येथील शेती व्यवसायाचे मागासलेपण कायम राहिले.

ईस्ट इंडिया कंपनीचे मुख्य धोरण म्हणजे जमिनीवर मोठया प्रमाणा-वर कर लादून तो गोळा करणे हे होते. यासाठी त्यांनी रयतवारी पध्दतीचा अवलंब केला व शेतसारा तीस तीस वर्षांसाठी एकदाच लागू केला. काही वेळा शेतसारा हा जमिनीतील माती व त्यामध्ये असणा-या पिका-वरही अवलंबून होता. १८३६ मध्ये पुणे जिल्ह्यातील इंदापूर तालुक्यातील ही योजना अमंलात आणली. कर हे पैशाच्या रूपाने गोळा केले जात. ब्रिटिश आमदानीत एकंदरीत व्यवहार पैशाच्या रूपात चालू झाल्यामुळे सारा भरण्यासाठी व आवश्यक वस्तूंच्या खरेदीसाठी स्वत:जवळचे धान्य विकण्याची शेतक-यावर पाळी आली आणि यामुळेच तो मध्यस्थाच्या व कमिशन एजंटच्या कचाटयात सापडला. शेतीच्या व्यापारीकरणाचीही सुरूवात ब्रिटिश कालावधीत लगेच झाली. त्यामुळे ब्रिटिश राजवटीनंतर पहिल्याच दशतकात अन्नधान्य उत्पादनापेक्षा व्यापारी पिकावर भर देण्यात सुरूवात झाली. शेतकरी आपल्या उत्पादनाचा मोठा भाग बाजारात आणू लागले. "व्यापारी पिकामुळे त्यांचे उत्पादन वाढले पण त्याचा खरा फायदा त्या पिकांना असलेल्या मागणीमुळे व्यापारी व सावकार यांचा झाला."[5] मात्र यामुळे अन्नधान्याचा तुटवडा जाणवू लागला की ज्यामुळे सर्वसामान्य शेतक-यांना जीवन जगण्यासाठी जास्त किंमतीने धान्य खरेदी करावे लागले.

इंग्रजांच्या महसूल पध्दतीने महत्त्वाचे वैशिष्टये म्हणजे महसूल हा पैशाच्या रूपाने गोळा केला जाई. याठिकाणी पिकाचा विचार न केल्यामुळे शेतक-यांच्यावर मोठा आर्थिक बोजा पडत होता. डॉ. ताराचंद्र यांच्या मते, "रयतवारी पध्दतीखाली येणारी शे. ५२ % पिकाऊ जमीन आणि रयत-

वारीचे वर्चस्व असणाऱ्या भागामधील परिस्थिती ही अतिशय वाईट होती. उदा. मुंबई आणि मद्रास या प्रांतामधील १८६६ च्या सुधारित मुंबई प्रेसिडन्सी अँक्टनुसार केलेली शेतसारामधील वाढ इतकी मोठी होती की, ते जबर भाडेच वाटावे. यामुळे शेतसारा भरल्यानंतर तसेच शेतीचा खर्च भागवल्यानंतर शेतकऱ्याजवळ कसलेही जादा (फायदा) उत्पन्न शिल्लक राहत नसे. मि. एलिफस्टन "हाऊस ऑफ कॉमन्स"च्या कमिटीपुढे भाषण करताना म्हणाले, "जमिनीच्या व्यवस्थापनामधील महत्त्वाची कमतरता म्हणजे मोठया प्रमाणात असणारे जमिनीवरचे कर." [६] कर पध्दतीमुळे कराची रक्कम ही ठराविक वेळेतच भरावी लागे. जरी सुगी दुष्काळामुळे किंवा अन्य काही कारणाने अयशस्वी झाली तरी सुध्दा कर भरावाच लागे. महसूल ठराविक मुदतीत भरला गेला नाही, तर जमिनीचा लिलाव करुन तो वसूल केला जाईल, तशी शेतकऱ्यांना शासनाकडून सक्त ताकीद मिळत होती. याचाच परिणाम म्हणजे शेतकरी आपली जमिन सरकारपासून वाचविण्यासाठी सावकारांच्याकडून कर्ज घेत होते. सावकार हे पैसे भरमसाठी व्याजाने आनंदाने देत असत. यातच भर म्हणजे ब्रिटिशांचे कायदे हे पूर्णपणे सावकारशाहीला पूरक व शेतकऱ्यांच्या विरुध्द होते. इंग्रजांच्यापूर्वी जर सावकारांची स्थिती पाहिली तर ती बरीच कमकुवत होती. शिवाय त्यांना इतरांची जमिन हडप करता येत नसे. परंपरेप्रमाणे मुदलाच्या इतकेच जर व्याज झाले तर दामदुप्पट वहिवाटीप्रमाणे त्यास जास्त पैसा वसूल करता येत नसे. ते प्रामुख्याने खेडयातील हिशोब ठेवणारे छोटेस दुकानदार होते. त्यांच्यांवर पंचायतीचा अंकुश होता. मात्र सरकारच्या कर पध्दतीमुळे जमिन वाचविण्याच्या धडपडीतून शेतकरी मोठया व्याजाने पैसे घेऊ लागले त्यामुळे ब्रिटिश अमदानीत सावकार गब्बर बनले. शेतकऱ्यांच्या वाढत्या कर्जामुळे ते पूर्णपणे सावकारांच्या वर्चस्वाखाली गेले. कर्ज न फेडता आल्यामुळे तारण ठेवलेल्या शेतकऱ्यांच्या जमिनीचे मालक सावकार बनले. "भरमसाट व्याजामुळे जमिनीचे हस्तांतरण सुलभ झाले" या काळात सावकारी हा धंदा होऊन बसला.

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

आणखी एक महत्त्वाचा परिणाम महाराष्ट्राच्या शेतीवर झाला. तो म्हणजे शेतीचे व्यापारीकरण झाले. ब्रिटिश राज्य स्थापनेनंतर भारत जागतिक बाजारपेठांशी जोडला गेला की ज्यामुळे ब्रिटिशांनी आपल्या मुख्य व्यापारी हेतूचा फायदा करुन घेता आला. शेतीच्या व्यापारीकरणामुळे महाराष्ट्रातील परंपरागत पीकपध्दत नष्ट होऊन त्याऐवजी भांडवलशाहीला फायदेशीर अशी उत्पादन पध्दत सुरु झाली. यामुळेच शेती उत्पादनाच्या प्रक्रियेमध्ये भांडवल गुंतविण्यास सुरुवात झाली. याचा महत्त्वाचा परिणाम म्हणजे भांडवल गुंतवणे सामान्य शेतक-यास अशक्य झाले. याचा पुरेपुर फायदा श्रीमंत शेतकरी व सावकारांनी घेतला. यामुळे गरीब शेतकरी व शेतमजूर यांच्या संख्येत मोठया प्रमाणात वाढ झाली. तेथील शेतीचे व्यापारीकरण झाल्यावर ब्रिटिशांनी ब्रिटनमधील भांडवलदारांना मदत करण्यास सुरुवात केली. यासाठी त्यांनी प्रचंड प्रमाणात महसूल आकारला. यामुळे शेती व्यवसायाचा प्रश्न अतिशय बिकट बनला. याचा फायदा सावकारांनी घेतला. सावकारांना संरक्षण देणारे कायदे व मोठया प्रमाणावर महसूल यामुळे शेतकरी वर्ग अस्वस्थ झाला. त्यातूनच शेतक-यांची बंड झाली. याचाच परिणाम म्हणून ब्रिटिशांनी सावकारांवरती कांही बंधने घालणारा १८७९ चा "दख्खन ॲग्रीकल्चर ॲक्ट" पास केला. परंतु याचा शेतीव्यवसायावर व सावकारशाहीला आळा घालण्यावर फारसा परिणाम झाला नाही." ८

ब्रिटिश काळातील शेतकरी समाजाची अवस्था वर्णन करताना म.फुले म्हणतात, "जरी शेतकरी आणि त्याचे कुटुंब हे अष्टौप्रहर राबत होते. तरी त्यांचे सर्वांचे मिळून मासिक वेतन एकतीस रुपये होते. तर एकटा युरोपियन अगर एतद्देशीय अधिकारी आपल्या चैनीवर दर महिन्याला पंधरा किंवा अधिक रुपये खर्च करतो. इंग्राज सैनिकाचे उत्पन्न प्रामाणिक कष्टाळू अशा हिंदी शेतक-यांच्या उत्पन्नापेक्षा दहा पटीने अधिक असते." ९

थोडक्यात रयतवारी पध्दत महाराष्ट्रात स्थापन होऊनही शेतक-यांचे द दैन्य कमी झाले नाही. उलट इंग्रज अमदानीत दुष्काळांचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले.

महाराष्ट्रातील दुष्काळ :

१९व्या शतकाच्या उत्तरार्धात भारतात मोठ्या प्रमाणावर दुष्काळ पडला. त्याची मोठी झळ महाराष्ट्राला पोहचली. १८७७-७८ मध्ये मुंबई प्रांताच्या दक्षिण भागात पडलेला दुष्काळ तर फारच भयंकर होता. या दुष्काळामुळे पाच-सहा लाख लोक भुकेने तडफडून मेले होते. साधारणपणे पुढील "तालिका" वरून वारंवार पडणा-या दुष्काळामध्ये भुकेने मृत्यूमुखी पडलेल्या लोकांची संख्या लक्षात येईल.

तालिका नं.२ [१०]

| वर्ष | मृत्यूमुखी पडलेल्या लोकांची संख्या |
|---|---|
| १८०० - १८२५ | १०,००,००० |
| १८२५ - १८५० | ४,००,००० |
| १८५० - १८७५ | ५०,००,००० |
| १८७५ - १९०० | १,५०,००,००० |

वरीलप्रमाणे मृत्यूमुखी पडलेली माणसे याला प्रामुख्याने ब्रिटिश सरकारचे अन्नधान्य दुष्काळ पडून अन्नधान्याचा तुटवडा असूनसुध्दा सरकारने या कालावधीत मोठ्या प्रमाणात गहू व मालाची निर्यात केली. उदा. पुढील तालिकेवरून हे स्पष्ट होईल.

तालिका नं.३

"गव्हाची १८६९ ते १८९२ पर्यंतची निर्यात" [११]

| वर्ष | निर्यात गव्हाची |
|---|---|
| १८६९ | २,७५,४८१ |
| १८७३-७४ | १७,५५,९५४ |
| १८८२-८३ | १,४१,९३,७६३ |
| १८९१-९२ | ३,२७,४०,००० |

"भारतातून इंग्लंडला गहू आणि भाची निर्यात" [१२]

तालिका नं.४

| वर्ष | भात आणि गहू पौंडामध्ये |
|---|---|
| १८४९ | ८,५८,००० |
| १८५८ | ३८,००,००० |
| १८७७ | ७९,००,००० |
| १९०१ | ९३,००,००० |
| १९१४ | १,९३,००,००० |

"१८७७-७८ मध्ये पडलेल्या दुष्काळामुळे तर लोकांची क्रयशक्तीच संपुष्टात आली होती. लोकांना रोजगार पुरविण्यासाठी शासनाने दुष्काळी कामे काढली होती. परंतु ती पुरी पडली नाहीत. मात्र दुष्काळी कामाबाबत सरकारी अधिकाऱ्यांनी सहानुभूतीशून्य कडक धोरण स्वीकारले होते.

रोज एक आणा पुरुषाला व अर्धा आणा बायकांना व मुलांना मजूरी मिळत होती. गुरांना चारण्यासाठी घाटावरील जंगले खुली करण्यात आली. तरी या दुष्काळात चाऱ्या अभावी हजारो गुरे तडफडून मेली आणि शेतीच्या प्रगतीला खिळ बसली." [१३] वारंवार पडणाऱ्या दुष्काळामुळे व सरकारच्या योग्य उपाय योजने अभावी शेतकरी हा अधिकच गरीब होत गेला की, ज्यामुळे शेती व्यवसायावर मोठेच संकट कोसळले होते. हे दुष्काळाचे संकट त्यानंतर नित्यनियमाने महाराष्ट्रावर येऊ लागले. कारण पाटबंधाऱ्याची सोय इंग्रजांनी केली नाही.

इंग्रजी राजवटीविरुध्दचे शेतकऱ्यांचे उठाव -

"मराठ्यांचे राज्य गेले त्यानंतर इंग्रजी अंमल सुरु झाल्याबरोबर दरोडेखोरीला सबंध महाराष्ट्रात अगदी ऊत आला होता. त्यावेळचे खानदेशातील तंट्या भिल्लाचे बंड व वडगांवच्या सखारामबापूचे बंडही प्रसिध्द आहे. तंट्या भिल्लाने तर इंग्रजांना अगदी "दे माय धरणी ठाव" करुन सोडले आणि वासुदेव बळवंत फडके यांनीही बंड केले होते. फडके यांचे बंड म्हणजे महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचे बंड इतकेच काय, पण बहुजन समाजाने पध्दतशीररीतीने उभारलेला व दिलेला पहिला क्रांतीचा लढा म्हणायला हरकत नाही." [१४]

महाराष्ट्रातील पुणे जिल्ह्यामध्ये साताऱ्या सरहद्दीवरील उमाजी नाईक यांचे बंड सर्वांस माहित आहे. त्याचप्रमाणे सत्त्या भिल्लाचे बंड प्रसिध्द आहे.

इंग्रजांचे राज्य महाराष्ट्रात स्थिर होण्यापूर्वी या उसळलेल्या बंडखोरांशी इंग्रजांना प्रखर सामना द्यावा लागला आणि त्यांना त्यांनी लगाम घालून पायबंद घातला. महाराष्ट्रात उच्छल झाल्लेल्या दरोडेखोरांची पुंडाई बंद पडून महाराष्ट्रात शांतता प्रस्थापित झाली.

इंग्रजांची राजवट सुरु झाल्यानंतर सावकारशाहीचे समाजावर वर्चस्व वाढले. इंग्रजांनी १८६८ साली शेतसा-यात वाढ केली. त्याचकाळात बाजारात धान्याच्या किंमती कोसळल्या. त्यामुळे शेतकरी हवालदिल झाले. त्यांच्या जमिनी सावकारांच्या घशात गेल्या. त्यामुळे १८७३-७४ साली महाराष्ट्रात शेतक-यांनी उठाव केले. यालाच "दख्खनचे उठाव" असे म्हणतात. या उठावा-च्या काळात शेतक-यांनी सावकारांच्या घरावर हल्ले केले. त्यांच्या चीजवस्तू लुटल्या आणि कागदपत्रांची जाळपोळ केली." [१५] इंग्रजांनी त्यानंतरच "फॅमिन रिलिफ कायदा" जारी केला.

## महाराष्ट्रातील शेतकरी प्रश्न : दोन दृष्टिकोण

महाराष्ट्रातील शेतक-यांच्या प्रश्नाचा दोन दृष्टिकोनांतून अभ्यास झाला. पहिला दृष्टिकोण न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांचा होता आणि दुसरा दृष्टिकोण महात्मा जोतिराव फुले यांचा होता.

महाराष्ट्रात "पुणे सार्वजनिक सभे"ची स्थापना इ.स. १८७० साली झाली. आणि सभेने राष्ट्रीय दृष्टिकोणातून आर्थिक प्रश्नांचा अभ्यास केला. प्रख्यात समाजसुधारक आणि अर्थशास्त्रज्ञ महादेव गोविंद रानडे यांनी याबाबत आपले विचार मांडले. न्यायमूर्ती रानडे यांच्या मते, "आपल्या शेती क्षेत्रास आधुनिक रुप द्यावयाचे असेल तर आधुनिक पध्दतीने शेती केली पाहिजे. ज्यांचा शेती करण्यामध्ये रस आहे आणि जे शेतीमध्ये भांडवल गुंतवू शकतात त्यांच्याकडे शेतजमिनीचे हस्तांतरण झाले पाहिजे. शेतक-यां मोठया प्रमाणात सहकारी संस्था स्थापन करुन पतपुरवठा करण्यात यावा."

सार्वजनिक सभा आणि न्यायमूर्ती रानडे यांचा दृष्टिकोण आर्थिक सिध्दांतावर आधारलेला होता. म.फुले यांनी या प्रश्नांकडे पाहण्याचा दृष्टिकोण विकसित केला.

महात्मा फुले यांनी आपल्या प्रसिध्द "शेतक-यांचा आसूड" व "गुलामगिरी" या पुस्तकात असे मत व्यक्त केले की, "शेतकरी हे त्यांच्या अज्ञानामुळे, दारिद्र्यामुळे पिळले जात आहेत. पेशवाईच्या काळामध्ये व त्यांच्यानंतरच्या सुरुवातीच्या काळामध्ये शिक्षण मिळाले नाही. त्यामुळे त्यांची एकसारखी पिळवणूक होत आहे. तसेच प्रशासन व्यवस्थेमध्ये ब्राह्मणांचे वर्चस्व होते. यामुळे सर्व कायदे, नियम, सवलती हे शेतक-यांच्या हिताविरोधी होते. इंग्रज अधिकारी हे सर्वस्वी ब्राह्मण वर्गावरतीच प्रशासनासाठी अवलंबून होते." [१७]

म. फुले नोकरशाही विषयी लिहितात की, "नोकरदारांना मोठमोठे पगार मिळतात. त्यांच्या चैनीवरती होणारा खर्च हा शेतक-यांच्या उत्पन्नापेक्षा जास्त आहे. शेतकरी हे नोकरशाहीच्या पिळवणूकीतून मुक्त झाले पाहिजेत. सावकार व्याजास अव्वाच्या सव्वा व्याज घेऊन शेतक-यांच्या सर्वनाशास कारणीभूत होतात. त्यांच्या जमिनी खरेदी करतात व शेतक-यांचे उदरनिर्वाहाचे साधनच नष्ट करतात." [१८] नोकरशाहीच्या फसवणुकीच्या व सावकारांच्या अडवणुकीच्या धोरणापासून शेतक-यांना मुक्त करण्यासाठी त्यांना योग्य प्रकारचे शिक्षण मिळाले पाहिजे. त्यांना कायदे कानून, सवलती इत्यादी मिळणे आवश्यक आहे. त्यांची सर्वांगीण उन्नती होण्यासाठी शेती विकासासाठी आवश्यक ते धोरण आखले पाहिजे त्यासाठी म.फुले यांनी काही मार्ग सुचविले.

## महात्मा फुले यांचे शेतकरी विषयक विचार -

म.फुले यांनी "शेतक-यांचा आसूड" या ग्रंथात शेतक-यांची परिस्थिती काय होती. याबाबत बारकाईने लिहिले आहे. सर्वसामान्य शेतक-यास जगणे मुश्किल झालेले होते. कर्जाचा बोजा वाढतच होता. कुटुंबांच्या

विकासाचा मार्गच बंद झालेला होता. सतत राबणे असेल तसे खाणे अशा प्रकारची स्थिती शेतक-यांची होती. म्हणून म. फुले लिहितात, "भट कामगाराच्या हातावर पैसा ठेवल्याशिवाय ते गरीबाच्या कामाला हात लावीत नाहीत. सडकेच्या कामावर बिगारी म्हणून लावल्यास भट अधिका-यांची मूठ गार केली नाही, तर ते वरच्या अधिका-यांना चहाड्या सांगतात. भट मामलेदार आपल्या जातभाईची कामे करुन घेण्यासाठी पुण्यासारख्या ठिकाणी- सुध्दा झोटिंग बादशाही करतात. भट कामगार कागदपत्रे अधिका-यास वाचून दाखविताना लबाडी करतात. आपल्या जातवाल्यास मदत करतात. गो-या अधिका-यांना मराठी भाषा चांगल्याप्रकारे समजत नाही. मराठीतून इंग्रजीत तरजुमा करताना भट कामगार लबाडी करतात." [१९] अशाप्रकारे शेतक-याचे शोषण होत होते असे म. फुले यांनी मांडलेले आहे.

शेतक-यांचे शोषण समाजातील भट, भिक्षुक, सावकार, भांडवलदार, जमीनदार, पांढरपेशा वर्ग, व्यापारी आणि इंग्रज सरकार करीत होते. अशा परिस्थितीत नोकरशाही शेतक-यांना न्याय देत नव्हती.

म.फुले यांनी शेतक-यांच्या शोषणावर उपाय खालीलप्रमाणे सुचविलेले आहेत - ते सांगतात "शेतीची योग्य प्रकारे मशागत करता यावी म्हणून चांगल्या जातीच्या गायी-बैलाची पैदास करण्यात यावी. त्यासाठी सरकारने परदेशातून चांगल्या गाईचे बेणे आणावेत. गाई न मारण्याचा कायदा करावा. डोंगर टेकड्यावरील गवत, पाला-पाचोळा, मेलेले किटक व श्वापद यांच्या हाडामासाचे सत्त्व पानाफुलांचे कुजलेले खत पावसाच्या पाण्याबरोबर वाहून जाऊ नये. म्हणून जागोजाग ताली वजा बंधारे बांधावेत. त्यामुळे कळवाचे पाणी एकंदरीत शेतात मुरुन नदी-नाल्यास मिळेल असे केल्याने शेते सुपीक होतील. हे काम लष्करातील काळ्या-गो-या शिपा- यांकडून करुन घ्यावे. त्याचप्रमाणे या पोतीस व शिपायांकडून डोंगर-

टेकड्यामधील द-याखो-यांनी तलाव-तळी जितकी होतील तितकी सोयी सोयीनी बांधून काढावी. म्हणजे त्यांच्या खालच्या प्रदेशात ओढया-खोड्यांनी भर उन्हाळ्यात पाणी असल्यामुळे जागोजागी धरणे होतील. विहीरीना पाणी मिळेल आणि बागायती शेती वाढेल. शेते धुपून त्यात खोंगळ्या पडू नयेत म्हणून शेतक-यांनी पाणलोटाच्या बाजूने शेतांच्या बांधांनी वरचेवर ताली दुरुस्त ठेवाव्यात. ज्या ठिकाणी झरे सापडतील त्याठिकाणी गावाच्या नकाशात नमूद करुन विहिरी पाडाव्यात. या विहिरी स्वत: बांधणा-यास लहानमोठी बक्षिसे देण्याची सरकारने व्यवस्था करावी. एकंदर सर्व नदीनाले व तलावातील साचलेला गाळ पूर्वी-प्रमाणेच शेतक-यास फुकट नेऊ द्यावा. गावराने फॉरेस्ट खात्यास सामील केली असतील तर ती शेतक-यास परत द्यावीत. जंगलातील इमारती लाकडे तोडु नयेत. पण इतर लाकूडफाटा तोडण्याची मुभा असावी. उत्तम शेळ्यामेंढयां-ची पैदास वाढविण्यासाठी परदेशातून त्यांची बेणी आणावीत. शेतक-यां-चा व त्याच्या पिकांच्या जंगली जनावरांपासून बचाव करण्यासाठी गावठी तोड्याच्या बंदुका शेतक-यास द्याव्यात. शेतक-यांची पिके जर जनावरांनी खाल्ली किंवा त्यांची नासाडी केली तर सरकारने त्याची नुकसान भरपाई पोलीस खात्यातील वरिष्ठ अंमलदारांचे पगार कापून करावी. साल दरसाल श्रावणमासी प्रदर्शने करुन आश्विनमासी शेतपिकांच्या व औते हाकण्याच्या परीक्षा घेऊन शेतक-यांस बक्षिसे व पदव्या द्याव्यात. शेतक-यांच्या मुलास लोहारी, सुतारी कामाचे शिक्षण द्यावे. त्यांना विलायतेतील शेतीशाळा पाहण्यास पाठवावे. तेथील सुधारणा बघून ते आपल्याकडेही त्याच प्रकारच्या सुधारणा करु शकतील. शंभर रुपये पगाराच्या वरील सर्व अंमलदारांचे पगार कमी करावेत. त्यांच्या पेन्शना कमी कराव्यात. मात्र शेतमजूर, कारागीर, लोहार, सुतार, बिगारी, डोलीवाले यांचे पगार कमी करु नयेत. शेतक-यांच्या मुलास पुस्तके पाटया व पेन्सिली पुरवाव्यात. तसेच शेतक-यास शेतीसुधारण्या-साठी शेतीसंबंधीचे सर्व ज्ञान देवून त्यासंबंधी ग्रंथ उपलब्ध करावे आणि शेतकी शाळा स्थापन कराव्या." [२०]

ब्रिटीश सरकारने शेतक-यांसाठी आणि शेतीसाठी या सुधारणा अंमलात आणल्याखेरीज शेतक-यांची परिस्थिती सुधारणार नाही. असे म. फुले यांचे मत होते.

## लोकमान्य टिळक आणि शेतकरी -

शेतीप्रश्नावर पुणे सार्वजनिक सभा आणि म. जोतीराव फुले यांनी आ आपले वेगवेगळे विचार व्यक्त केले. पण इ.स. १८७५ नंतर राजकीय चळवळीस बळ प्राप्त झाले. इ.स. १८८५ साली भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसची स्थापना झाली. शेतक-यांच्या दैन्यास भारताच्या गरिबीस इंग्रजी राजवट जबाबदार आहे. इंग्रज सरकारची धोरणे जबाबदार आहेत. हे लोकांच्या लक्षात येऊ लागले. लोकमान्य टिळक यांनी शेतकरी प्रश्नाची साम्राजवादी बाजू व्यवस्थित-पण ओळखली होती.

## तत्कालीन शेतीसंबंधीचे विचार -

लोकमान्य टिळक यांनी तत्कालीन शेतीसंबंधी विचार करताना शेती करण्याची पध्दत, शेतीची मालकी व उपाय यावर विचार व्यक्त केले आहेत. त्यांच्या मते पेशवेकालीन शेती ही जुन्या पध्दतीने केली जात होती. आणि त्यात इंग्रजी व्यवस्थेमध्ये कोणताच फरक पडला नाही. शेती ही पूर्णपणे पावसावरती अवलंबून असल्यामुळे पाऊस कमी जास्त पडल्यास वारंवार दुष्काळ पडत होते. यामुळे शेतीतून निघणारे उत्पादनसुध्दा कमी निघत होते. इंग्रजी राजवटीमध्ये त्यांच्या साम्राज्यशाही धोरणामुळे इतर उद्योगधंदेही बंद पडल्या-मुळे या काळात सर्व बोजा शेतीवरच पडला. जमीन कमी व त्यावर उपजीविका करणा-या लोकांची संख्या जास्त असे. वर्णन त्या काळच्या शेती व्यवस्थेचे टिळकांनी केले आहे. शेतीमध्ये कोणत्याही प्रकारचे आधुनिकीकरण केले नव्हते. जमिनीचा कस सुध्दा वारंवार पिके घेऊन या कालावधीत कमी झाला होता.

इंग्रज राजवटीमध्ये त्यांनी केलेल्या रयतवारी पध्दतीला काही प्रमाणात टिळकांनी विरोध केला. कारण त्यामध्ये शेतसारा घेण्याची जी तरतूद होती ती टिळकांना मान्य नव्हती. ते याविषयी म्हणतात, "मराठी राज्यांत ऐन सा-याच्या वसुलावर कोणाला दोन टक्के, तर कोणाला पाच टक्के या त-हेने देशमुख, देसाई, देशपांडे वगैरे हक्कदार लोकांस सा-याचा भाग मिळत असे. व त्यामुळे जिल्ह्यातून किंवा तालुक्यातून या मंडळीचे चांगले वजन होते. परंतु मराठी राज्यानंतर अव्वल इंग्रजीतच ही पध्दत मोडली जाऊन जमिनीचे सारे शेतक-यांकडून एकदम सरकारकडे भरण्याची सुरुवात झाली. देसाई, देशमुख वगैरे मध्यम प्रतीचे लोक व त्यांचे वजन कमी होऊ लागले. अशारीतीने मध्यम प्रतीचा वर्ग मोडल्यानंतर सर्व्हे किंवा पहाणी पुन: पुन: होऊन शेतक-यांचा सारा होईल तितका वाढविण्याची सुरुवात झाली. ती इतकी की या पध्दती-चा एकसारखा आज साठ वर्षे अंमल असल्यामुळे एक वर्ष पाऊस न पडला की, शेतकरी अन्नान्न दशेस येतो हे दुष्काळाच्या उदाहरणावरून आता निर्विवाद झाले आहे." [२१] तत्कालीन शेतक-यांकडे जमिनीला खत घालून किंवा अन्य सुधारणा करणे पैशा अभावी शक्य होत नव्हते.

शेतीच्या मालकीविषयी लिहिताना लोकमान्य टिळक म्हणतात, "शेतक-यास फक्त नांगर लागेल तिथेपर्यंत जमिन नांगरून पीक काढण्याचा हक्क आहे. त्याच्याखाली दगडाची किंवा सोन्याची खाण लागली किंवा वट पाखरू असेल तर ते सरकारचेच, त्यामुळे पृष्ठभाग लागवड करून उत्पन्न काढून सारा भरला तरच ती जमिन शेतक-यांची नाहीतर ती सरकार काढून घेणार"[२२] थोडक्यात शेती पध्दतीमध्ये नवीन कोणताही बदल न होता उलट शेतक-यांवर स सरकारकडून जाचक निर्बंध घातले जात होते असे त्यांचे मत होते.

## लोकमान्य टिळकांचे दुष्काळातील कार्य -

लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या काळात महाराष्ट्रात १८७७-७८ व

१८९६-९७ आणि १९०० या साली मोठे दुष्काळ पडले होते. या दुष्काळामुळे शेतक-यांची झालेली दयनीय परिस्थितीचे वर्णन करुन शेतक-यांचे अनेक मुलभूत प्रश्न सरकारपुढे मांडले. दुष्काळाशी टक्कर देण्याइतके सामर्थ्य रयतेत का नाही ? आणि दुष्काळाच्यावेळी निर्वाह चालविता येण्याइतकी शिल्लक प्रजेपाशी का नसावी ? महाराष्ट्रामध्ये दुष्काळ पडल्यास मद्रास, बंगाल, ब्रह्मदेश या प्रांतांतून तेथील लोकांना पुरुन उरेल एवढे धान्य पिकले आहे. पण ते धान्य विकत घेण्यास महाराष्ट्रातील रयतेपाशी पैसेच नाहीत.

महाराष्ट्रात पडलेल्या दुष्काळाला टिळकांनी सार्वजनिक सभेच्या माध्यमातून लोकांना धीर देऊन तोंड दिले. सभेच्यावतीने एक निवेदन काढून सरकारला चांगलेच अडचणीत आणले होते. "ठिकठिकाणच्या पुढा-यांनी हा दुष्काळ संपेपर्यंत सरकारच्या कार्यावर सारखी नजर ठेवून लोकांच्या गरजा सरकारच्या कानी घातल्या पाहिजेत. फॅमिन इन्शाअरन्स फंड गिळून टाकणा-या सरकारास पैशाची सबब सांगता येणार नाही. कारण दुष्काळाचा विमा शेतक-यानी उतरला असून त्याबद्दल प्रत्येक वर्षी दीड कोटी रुपयांची रक्कम गेली पंधरा वर्षे भरीत आहेत. फॅमिन रिलिफ कोड लागू करुन ते नीट अमलात आणा याबद्दल सगळीकडून तगादा लावल्याशिवाय ताबडतोब उपाय योजणार नाही यासाठी सरकारकडे हजारो अर्ज गेले पाहिजेत." [२३] दुष्काळात मिळ-णा-या सरकारी सवलती लोकांनी पदरात पाडून घेण्यासाठी टिळकांनी "केसरी"तून मार्गदर्शन केले होते.

एका बाजूला लोकमताचा चाप लावून दुसरीकडे टिळक सरकारला सतत पेचात पकडत होते. टिळकांचे दुष्काळातील सरकार संबंधाचे लेखन कायद्याची मर्यादा न ओलांडता सरकारचे हेतू व निष्क्रियता उघडकीस आणणारे होते. टिळकांनी लोकांच्या स्थानिक पुढा-यांनी दुष्काळ निवारण्यासाठी काय करावे याचे मार्गदर्शन केले होते. एका बाजूला नोकरशाही व दुस-या बाजूला अडाणी शेतकरी यांच्यामधील दुवा म्हणजेच लोकांचे पुढारी होत.

लोकमान्य टिळक पुढाऱ्यांना उद्देशून म्हणतात, "शेतकरी किंवा मजूर लोक अगदी अज्ञान व गरीब आहेत. त्यांच्याकरिता खरा उद्योग सुशिक्षित लोकांनीच केला पाहिजे. व तो जर तालुक्यातील पुढारी लोक करणार नाहीत तर आपल्या देशाचे दुर्दैवच अद्याप संपले नाही असेच म्हणावे लागेल. दुष्काळामुळे पिके बुडाली, गुरे मरत चालली व लोक देशोधडीस लागून अन्नावाचून मरू लागले अशी परिस्थिती अनेक ठिकाणी आहे. अशावेळी गरीब जनतेच्या साहाय्यासाठी पुढाऱ्यांनी झटणे आवश्यक आहे."[२४]

थोडक्यात लोकमान्य टिळकांनी शेतकरी प्रश्नांची आंदोलनात्मक बाजू लोकांच्यापुढे आणली.

## महात्मा फुले यांचे शेतकऱ्यांच्यासंबंधी विचार व लोकमान्य टिळक यांची राजकीय चळवळ यांचा समन्वय -

विसाव्या शतकाच्या सुरुवातीस शेतकऱ्यांचे शोषण मोठ्या प्रमाणात वाढले हे शोषण एका बाजूने ब्रिटिश साम्राज्यशाही करीत होती तर दुसऱ्या बाजूने साम्राज्यशाहीचे भारतीय हस्तक सावकार व्यापारी आणि कमिशन एजंट करीत होते. लोकमान्य टिळक सर्व मारा ब्रिटिश साम्राज्यशाहीवर करीत होते. आणि सावकारास संशयाचा फायदा देत होते. तर जोतीरावांचा सर्व हल्ला ब्राह्मण, सावकार सरकारी अधिकारी आणि दलाल यांच्यावर होता. त्यांनी ब्रिटिश सरकारवर जोराचा हल्ला चढविला नाही. पण विसाव्या शतकात शेतकऱ्यांना आपले हे दोन्ही शत्रू स्पष्ट दिसत होते. त्यामुळे साम्राज्यशाही आणि सावकारशाहीवर हल्ला करणारी म. फुले आणि लोकमान्य टिळक यांच्या विचारांचा समन्वय करून किसान कामगारांचे लोकराज्य स्थापन करणारी राजकीय व्यूहनीती विकसित करणे आवश्यक होते. म. गांधी यांनी त्यांच्या चळवळीमध्ये या दोन्ही गोष्टीचा समन्वय केला आणि खेडा व चंपारण येथे इंग्रजाविरुद्ध शेतकऱ्यांची चळवळ उभी केली.

म. गांधीच्या नेतृत्त्वाखानी काँग्रेसला खऱ्या अर्थाने लोकचळवळीचे स्वरूप प्राप्त झाले. १९२० ला असहकार चळवळीतून खेड्यापाड्यातील लाखो शेतकऱ्यांनी भाग घेतला. शेतीसुधारणा, जातीव्यवस्था विरोध, स्त्री-मुक्ती या विषयावर म. गांधीचे विचार प्रागतिक होते. सत्याचे ते थोर पुरस्कर्ते होते. सत्यशोधक समाजात त्यांच्याबद्दल कुतुहल निर्माण झाले. नवा वर्ग म. गांधीच्याकडे झुकू लागला. १९२८-२९ नंतर काँग्रेसमध्ये पंडीत नेहरूंचे नवे नेतृत्त्व उदयास आले. १९२९ साली पंडीत नेहरूनी जहाल डाव्या राष्ट्रवादाचा पुरस्कार केला. समाजावादाची घोषणा केली. त्यामुळे इतके दिवस काँग्रेसपासून फटकून वागणारे महाराष्ट्रातील शेतकरी पुढारी काँग्रेसमध्ये सामील झाले. १९३० साली केशवराव जेधे व त्यांचे अनेक सहकारी काँग्रेसमध्ये आले.

श्री. नाना. पाटील त्या काळात सातारा जिल्हयात कार्य करीत होते. त्यांनी आपल्या कार्यात या दोन्ही तत्त्वांचा समन्वय केला आणि स्वातंत्र्याच्या चळवळीत हिरीरीने भाग घेतला.

## सातारा जिल्हयातील चळवळ -

लोकमान्य टिळक यांच्या युगात साताऱ्याचे महत्त्व अनन्यसाधारण होते. त्यांचे सहकारी सातारचे बडे नामांकित वकील श्री. दादासाहेब करंदीकर यांचेनंतर श्री. रामचंद्र गणेश उर्फ भाऊसाहेब सोमण, द.कृ. उर्फ बुवा गोसावी वकील, शंकरराव साठेवकील, हे बडे पुढारी तर श्री. नाथ घाणेकर, नरूभाऊ लिमये, रा.ना. गोडबोले, जाजू शेटजी वगैरे काँग्रेस नेते होते. अशा प्रकाराने सातारा जिल्हयात राष्ट्रीय चळवळ रूजलेली होती.

## सातारा जिल्हयातील सत्यशोधक आणि ब्रह्मणेतर चळवळ -

सत्त्यशोधक चळवळीचा जोर इतर जिल्हयापेक्षा सातारा जिल्हयात अधिक होता. सत्त्यशोधक समाजाचे महाराष्ट्रातील बहुजन समाजात मोठीच

क्रांती घडवून आणली. बहुजन समाजाला त्याच्या वास्तव स्थितीची जाणीव करून देण्याचे आणि ही स्थिती बदलण्यासाठी त्यांच्यात नव-चैतन्य निर्माण करण्याचे कार्य सत्त्यशोधक समाजाने केले. म. फुले यांनी सत्त्यशोधक चळवळीची मुहूर्तमेढ रोवली. २०व्या शतकाच्या सुरूवातीला छत्रपती शाहू महाराज यांच्या रूपाने सत्त्यशोधक चळवळीला पुन्हा एकदा समर्थ नेतृत्व लाभले. ही चळवळ महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात पसरू लागली. सातारा व कोल्हापूर जिल्ह्यात तर या चळवळीने प्रचंड खळबळ माजवली. नामदार भास्करराव जाधव, कर्मवीर भाऊराव पाटील, श्री. नाना पाटील यांनी ही चळवळ पश्चिम महाराष्ट्रात पसरवली.

"सातारा जिल्ह्यातील लोकांनी लाकजागृती घडवून आणण्याच्या कार्यावर भर दिला. त्या काळात भिलवडीच्या पाटोळयांचा जलसा, काले गावच्या घाडग्यांचा जलसा, कासेगांवच्या नाथोबा पाटलांचा जलसा हे सत्त्यशोधक जलसे विशेष प्रसिध्दीस आले होते. हे लजसे ग्रामीण भागात प्रचारासाठी फिरत व लोकांना सामाजिक अन्यायाची जाणीव करून देत असत. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी या काळात मोठे कार्य केले." [२५]

सातारा जिल्ह्याच्या ग्रामीण भागात फोफावू लागलेल्या सत्त्यशोधक चळवळीचा प्रभाव श्री. नाना पाटील यांच्या तरूण मनावर चांगलाच पडला. नाना पाटील यांनी आपल्या भोवतालच्या समाजाकडे डोळसपणे पाहण्यास सुरूवात केली. शिक्षणामुळे एक विशिष्ट दृष्टिकोण त्यांना प्राप्त झाला होता. अज्ञान, निरक्षरता, अंधश्रध्दा व देवभोळेपणा यामुळे खेडयातील सामान्य जनता भरडली जात आहे. सत्त्यशोधक जलशांनी नाना पाटील यांना नवी दिशा दिली. शेतकऱ्यांची पिळवणूक ते पहात होते. आपल्या मनाला जी गोष्ट पटते ती प्रत्यक्षात आणावयाची हा बाणा नाना पाटील यांचा होता.

आपल्या विचारांचे चार सवंगडी जमवून सत्त्यशोधक समाजाची तत्त्वे लोकांच्या पर्यंत पोहचवू लागले. त्यांनी खेड्यातील शेतक-यांचाच सतत विचार केला. स्वत:चे लग्न स्वत:च सत्त्यशोधकीपध्दतीने केले. सत्त्यशोधक समाजाच्या चळवळीतून ब्राम्हणेतर चळवळीचा उदय झाला. ब्राम्हणेतरांचे राजकीय अधिकार जपणे हे तिचे उद्दिष्ट होते.

ब्राम्हणेतर चळवळ (पक्ष) -

१९२२ साली ब्राम्हणेतर पक्षाची स्थापना केली. भास्करराव जाधव हे सातारा जिल्ह्यातील या पक्षाचे पुढारी होते. सत्त्यशोधक चळवळीत बहुजन समाजाबरोबरच ब्राम्हण जातीचेही लोक होते पण ब्राम्हणेतर पक्षात फक्त बहुजन समाजातीलच लोक होते. "याच काळात १९३० च्या म.गांधीच्या मिठाचा सत्त्याग्रह, कायदेभंग वगैरे चळवळीत कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे, केशवराव जेधे, दिनकरराव जवळकर आदी बहुजन समाजाचे नेते सामील झाले. सत्त्याग्रह करुन तुरुंगात गेले व मग आपोआपच ब्राम्हणेतर पक्षाचे पितळ उघडे पडले. शिक्षण क्षेत्रात काम करणा-या कर्मवीर भाऊराव पाटील यांनी सुध्दा त्यावेळी सातारा येथील "ऐक्य" या दैनिकात लेख लिहून भास्करराव जाधव यांच्यासारख्या अराष्ट्रीय नेत्यांच्यावर टीकेची झोड उठविली होती. १९३४ साली जनतेने ब्राहमण-ब्राम्हणेतर वादाला मूठमाती दिली. १९३७ च्या विधानसभा निवडणुकीत भास्करराव जाधव मराठी जातीसाठी ठेवलेल्या राखीव जागेवरसुध्दा पराभूत झाले." [२६]

नंतरच्या काळामध्ये ब्राम्हणेत्तर चळवळ स्वार्थी मतलबी आणि इंग्रजांचे हुजरेगिरी करणा-या सधन लोकांच्या हातात गेली. दुस-या बाजीरावाने प्रथम १८०२ साली इंग्रजांशी वसई तह करुन त्यांचे मांडलिकत्त्व पत्करले. १८१८ साली संपूर्ण शरणागती पत्करुन इंग्रजांच्या हातावर मराठी राज्याचे उदक सोडले. पेशवाई इतिहास जमा झाली. "कोणत्याही क्षेत्रात बहुसंख्य

इतर जातींच्या लोकांचे हितसंबंध, भावना यांच्याविरूध्द त्यांच्या अडच-णीचा, दुहींचा फायदा घेऊन मुठभर ब्राह्मणमंडळी त्यांच्यावर कुरघोडी करतात. केवळ सातारा जिल्ह्याच्या अगर महाराष्ट्राच्या काँग्रेसच्या नेतृत्त्वात मुठभर शिकलेले लोक उच्चवर्गीय करीत होते. अनेक उद्योग करून ते आपले बस्तान सतत बसविण्यासाठी प्रयत्नशील असत. म्हणजेच सातारा जिल्हया-च्या काँग्रेस वरचे ब्राह्मण नेत्यांचे वर्चस्व होते." २७

ब्राह्मणेतर पक्षावर ब्राह्मणेतरांतील सधन शेतकरी कारखानदार कॉन्ट्रॅक्टर, व्यापारी, दलाल, सावकारांचे वर्चस्व होते. सातारा जिल्हया-तील कूपरशाहीचा पगडा लक्षात घेण्यासारखा आहे.

"भारत स्वतंत्र्य होण्यापूर्वी संस्थानिक म्हणून ओळखले जाणारे थोडे थोडके नव्हते. सुमारे सहाशे लुटीपुटीचे राजे इंग्रज सरकारच्या कृपा छत्राखाली मजेत राज्य करीत होते. हे ऐकून व त्यांच्या कारभारांच्या गमती जमती वाचून नव्या पिढीला आश्चर्य वाटेल. अगदी त्याचप्रमाणे गांधी युगाच्या प्रभातकाळी सातान्यासारखा जागृत व बंडखोर म्हणून ओळखला जाणाऱ्या मोठ्या जिल्हयात एका पारशी गृहस्थाने आपले अधिराज्य वीस वर्षे चालविले होते." २८

"खानबहादूर धनजी शहाकुपर, बोमनजी कपूर हे त्यांचे नांव होते. शिक्षण जुन्याकाळातील मॅट्रिकपर्यंत म्हणजे जेमतेम होते. मुंबई, अहमदाबाद अशी कारखानदारीची शहरे सोडून कूपर घराणे सातारला स्थाईक झाले. पाडळी म्हणजेच सातारा रोड येथील नांगर, एंजिने, शेती अवजारे वगैरेंचा लोखंडी कारखाना जिल्हयातील दारू दुकानांची होलसेल एजन्सी, जंगल संपत्तीची व इतर अनेक प्रकारची कंत्राटे इंग्रज सरकारच्या कृपेने मिळालेली होती. अशा-प्रकारे खूप संपत्ती मिळविलेली होती. राजकीय धोरण म्हणावे तर बहुजन

समाजातील स्वार्थी लोकांना एकत्र आणून इंग्रज सरकारकडून रावसाहेब, खानसाहेब कैसर-ई-हिंद पदक असे किताब आणि निरनिराळी कंत्राटे मिळवून देण्याच्या लालसेने काँग्रेसच्या स्वातंत्र्य लढयापासून जनतेला दूर ठेवण्याचे प्रयत्न करीत होते." २९

१९३० मध्ये ब्राह्मणेतरांचा काँग्रेस प्रवेश झाला. आणि महाराष्ट्रातील बहुजन समाजाचा चेहरा-मोहराच बदलून गेला. साम्राज्य शाहीविरुद्ध श्री. नाना पाटील, केशवराव जेधे, भाऊराव पाटील, शंकरराव मोरे यांनी आवाज उठविला. साम्राज्यशाहीविरुद्ध श्री. नाना पाटील यांनी सातारा जिल्ह्यात मोठी जागृती घडवून आणली यातून श्री. नाना पाटील यांचा उदय झाला. नाना पाटलांच्या कार्याचे महत्त्व सांगताना आचार्य जावडेकर लिहितात, "म. गांधी युगात सातारा जिल्ह्यांत काँग्रेसची शक्ति वाढविण्याचे काम अनेक देशभक्तांनी केले. परंतु नाना पाटील यांच्याइतकी छाप किंवा मोहिनी इतर कोणत्याही व्यक्तिला शेतकरी वर्गावर पाडता आलेली नाही. खरा हिंदुस्थान खेड्यांत आहे आणि खेड्यांतील खरी शक्ती शेतकरी वर्गात आहे. या शेतकरी वर्गाला स्वातंत्र्याच्या क्रांतीची प्रेरणा देण्यास श्री.नाना पाटील कारण झालेले आहेत. यामुळे १९४२ च्या क्रांतीकालातील आंदोलनात साताऱ्यात ज्या क्रांतीची ज्योत पेटली तिचे बरेच श्रेय नाना पाटील यांच्याकडे जाते." ३०

श्री. नाना पाटील यांनी राष्ट्रसभेला स्वातंत्र्य निष्ठेला साजेल असेच आपले धोरण ठेविले आणि १९४२ साली विद्यार्थी वर्गातून जी नवी क्रांतिकारक पिढी साताऱ्यात पुढे आली. तिला प्रेरणा देऊन साताऱ्यात एक प्रचंड क्रांतीज्योत पेटविली. ही १९४२ ची क्रांतीशक्ती अखिल भारतीय शक्ती होती व तिचे नेतृत्त्वही अखिल भारतीय होते.या भारतीय क्रांतीशक्तीचे लोण शेतकरी वर्गात पोहचविण्याचे कार्य साताऱ्यात फार मोठया प्रमाणावर

झाले असून तेथे त्या शक्तीस एक विशिष्ठ आकार येऊ लागला आहे.
"१९४२ पासून साता-यातील खेड्यांत एक प्रचंड शक्ती प्रकट होऊ लागली असून शिवाजी महाराजांची स्वातंत्र्य निष्ठा आणि गनिमी कावा समाजवादाचे शेतकरी कामकरी राज्य आणि नेताजी सुभाषचंद्र यांचे आझाद हिंद सरकार व आझाद हिंद सेना या सर्वांपासून या क्रांतीशक्तीला प्रेरणा व चालना मिळालेली आहे." [३१]

श्री. नाना पाटील काँग्रेसच्यावतीने श्रमजीवी समाजाला राजकिय आणि सामाजिक अन्यायाशी सामना करायला तयार केले. त्यांचा राजकिय आणि सामाजिक प्रश्नांकडे पाहण्याचा दृष्टिकोन सर्वंकष आणि मुलगामी होता. सत्यशोधक समाजाच्या चळवळीत भाग घेऊन त्यांनी उच्चवर्णीयांच्या सामाजिक अन्यायास विरोध केला. त्यामुळे त्यांचे सहकारी व महाराष्ट्रातील एक थोर पुढारी साथी एस्.एम्. जोशी लिहितात, "श्री. नाना पाटील यांच्या ठिकाणी जनतेला आपल्या इच्छा आकांक्षांचे प्रतिबिंब पाहावयास मिळते. यांच्या जीवनात आमच्या शेतकरी समाजातील तरुणांना आपल्या मनातील तळमळ आणि तडफड पाहावयास मिळते. त्यांच्या इच्छा आकांक्षा आणि त्यासाठी द्यावा लागणारा लढा यांचे मूर्तीमंत चित्र नानांच्या रूपाने आज आपणापुढे उभे आहे." [३२]

.....

## प्रकरण पहिले

### संदर्भग्रंथ


१) सुतार अ.मा. "विसाव्या शतकातील राष्ट्रीय काँग्रेस", प्रस्तावना.

२) औटी व्ही.बी./चौसाळकर अशोक - "म. जोतिराव फुले यांच्या विचारांचे राजकिय स्वरूप" शोधनिबंध तिसरे महाराष्ट्र राज्यशास्त्र परिषद, पृ. २०.

३) Shinde J.R. - "Dynamics of Cultural revolution 19th Century Maharashtra," Ajanta Publication, Jawahar Nagar, Delhi-7, 1985, P. 15.

४) सरदार, गं.बा. - "महात्मा फुले व्यक्ति आणि विचार" दिनकर गांगल, अभिनव वाचक चळवळ, मुंबई-१४, नोव्हेंबर १९८२, पृ. ७९.

५) Tarachand - "History of the Freedom Movement in India." Volume II Govt. of India, New Delhi-1, P.282.

६) Ibid - P. 286.

७) साळुंखे, पी.बी. - "महात्मा फुले गौरव ग्रंथ", महाराष्ट्र राज्य, शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२, जुलै १९९२, पृ. ५२८.

८) पाटील, वसंत मारुती - "वासाहतिक समाजातील शेतकरी प्रश्न", पृ. १३.

९) कीर, धनंजय - "महात्मा जोतिराव फुले आमच्या समाजक्रांतीचे जनक" रामदास भटकळ, मुंबई-३४, पृ. २१२.


LIBRARY
KOLHAPUR

१०) Mujamdar, R.C.(Ed.) - "British Parmountary & India Renaissance." II edition, 1970, P.886.

११) Bipan Chandra - "Rise & Growth of Economic Nationalism in India." P. 163.

१२) सरदार गं.बा. -"महात्मा फुले व्यक्ती आणि विचार" लोखंडे आणि जोशी, प्र.आ. जून, १९८१, पृ. १८४.

१३) Shinde, J.R. Op.Cit. p. 123.

१४) पाटील, उत्तमराव/लाड, अप्पासाहेब - "क्रांतीवीर नाना पाटील", पृ. ३.

१५) पाटील, वसंत मारुती - "वासाहतिक समाजातील शेतकरी प्रश्न", पृ. २२.

१६) Chousalkar, Ashok - "Political thought of M.G.Ranade" in Political thought in Modern India Indira Gandhi National open University, New Delhi, 1992.

१७) पाटील, वसंत मारुती - "वासाहतिक समाजातील शेतकरी प्रश्न" पृ. २६.

१८) पाटील, व.मा. - कित्ता - पृ. २६.

१९) चौसाळकर अशोक, - "महात्मा फुले आणि शेतकरी चळवळ", पृ.२६

२०) चौसाळकर अशोक - कित्ता, पृ. ३६.

२१) समग्र लोकमान्य टिळक खंड-३, केसरी प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती, १९७६, पृ. ३७४.

२२) समग्र लोकमान्य टिळक खंड ३, केसरी प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती, १९७६, पृ. ३१५.

२३) केसरी, २० आक्टोबर, १८९६.

२४) समग्र लोकमान्य टिळक, खंड-३, पृ. ४७१.

२५) पाटील, उत्तमराव/लाड, अप्पासाहेब, "क्रांतिवीर नाना पाटील" पृ. २३.

२६) पाटील, रा.तु. - "सांगली साता-याचे राजकारण"; पृ. १८.

२७) कित्ता, पृ. १९ व २०.

२८) कित्ता, पृ. २४.

२९) कित्ता, पृ. २४.

३०) पवार, जयसिंगराव (संपा.) - "क्रांतिसिंह नाना पाटील", पृ.२६०.

३१) पाटील, उत्तमराव/लाड,अप्पासाहेब - "क्रांतिवीर नाना पाटील," पृ. ६.

३२) कित्ता, पृ. ९.

......